# One Day Interdisciplinary National E-Conference on

# 'Covid-19' & Its Impact On The Various Factors

26 May 2020

ISBN : 978-81-942797-4-7

●Organised By ●

## M.E.S. Arts & Commerce College


Mehkar, Dist. Buldana 443301 Maharashtra

Affiliated with

Sant Gadge Baba Amravati University, Amravati

## E-Souvenir

Impact Of COVID-19 lockdown on the Agricultural Sector




Impact Of COVID-19 lockdown on the Industrial Sector



Corona


Impact Of COVID-19 lockdown on the Service Sector



Impact Of COVID-19 lockdown on the Unorganised Sector



Impact Of COVID-19 lockdown on the Social & other sector



Dr. G. N. Parihar
Chief Editor

Dr. U. S. Kale
Editor

Dr. P. A. Joshi
Editor

Prof. G. D. Saoji
Editor

Painganga Prakashan, Aurangabad
paingangaprakashan@gmail.com 9975132211 9850927424

Scanned with OKEN Scanner

पेनगंगा प्रकाशन

# INDEX


| | AGRICULTURE SECTOR | |
|---|---|---|
| 1 | A Study of the Impact of Covid-19 on Agriculture Sector<br>**Mrs. Preeti V. Sarda** | 1 |
| 2 | Impact of Covid-19 on Environment<br>**Lt. Dr. Amit Masih** | 7 |
| 3 | Impact of Covid -19 Lockdown on The Agriculture Sector<br>**Sumey Rameshwar Shende, Dr. T.G.Mirge** | 12 |
| 4 | The study on Impacts of Covid-19 Lockdown on Agriculture Sector in Indian Economy<br>**Mr. Aniket L. Pande** | 17 |
| 5 | Impact of Covid – 19 on Agricultural Sector<br>**Swapnil Haribhau Dandade** | 21 |
| 6 | Impact of COVID-19 Lockdown on Agriculture Sector<br>**Mr.Pankaj Madhukarrao Raut** | 25 |
| 7 | Studies on Impact of Covid19 Global Outbreak on Agriculture Sector and the Government Policies<br>**Nitin Kasture** | 30 |
| 8 | Impact of Covid-19 Lockdown on Agricultural Sector<br>**Asst. Prof. Vijay Janrao Pathak** | 34 |
| 9 | Impact of Covid-19 Lockdown on Indian Agriculture Sector<br>**Mr. Pranay D. Belsare** | 37 |
| 10 | The Impact of Coronavirus (COVID–19) on the Agriculture Sector of India<br>**Sharique S. Shaikh, Suryakant B. Borul** | 43 |
| 11 | Impact of Covid-19 on Agricultural Sector<br>**Dr . J.M. Kale, Prof.Shubhangi Gore** | 50 |
| 12 | Impact of COVID- 19 on Agriculture Sector<br>**Dr. B. Somatkar** | 56 |
| 13 | Impact of COVID- 19 Lockdown on the Agricultural Sector<br>**Dr. Vanita Harihar Chaudhari** | 60 |
| 14 | शेतकऱ्यावर झालेला कोरोना विषाणूचा आघात<br>**प्रा. डॉ. अनुराधा रा. मुळे** | 64 |
| 15 | कोविड–19 चा शेतकऱ्यांवर व शेतदरावर झालेला परिणाम<br>**भूमिका कापगते** | 68 |
| 16 | कोविड–19 चे शेतीवर व शेतकामावर होणारे परिणाम<br>**डॉ. छाया निलकंठ लंजे** | 71 |
| 17 | कोविड – 19 टाळेबंदीचा कृर्शी क्षेत्रावर झालेला परिणाम<br>**डॉ.सतिश वा राणे** | 74 |
| 18 | भारतीय शेती क्षेत्रावर कोरोना–१९ च्या लॉकडाऊनचा परिणाम<br>**प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन** | 77 |
| 19 | कोविड–१९ मुळे घोषित लॉकडाऊनचा खाद्य पदार्थ आणि कृषीक्षेत्रावर झालेल्या परिणामांचा अभ्यास<br>**डॉ. संजय मोतीराम दांदडे** | 83 |
| 20 | कोविड–१९ लॉकडाऊनचा कृषीवरील परिणाम<br>**डॉ. संजय वराडे** | 88 |




Scanned with OKEN Scanner

One Day Interdisciplinary National E-Conference on
Covid-19 & Its Impact on the Various Factors
Organized By - M.E.S. Arts & Commerce College Mehkar,
Dist Buldana - 443301 Maharashtra
Date : 26 May 2020 ISBN - 978-81-942797-4-7
पैनगंगा प्रकाशन

# भारतीय शेती क्षेत्रावर कोरोना-१९ च्या लॉकडाऊनचा परिणाम

**प्रा. डॉ. दिलीप पांडुरंग महाजन**
सहयोगी प्राध्यापक,
अर्थशास्त्र विभागप्रमुख
एस.पी.एम. तात्यासाहेब महाजन कला व वाणिज्य महाविद्यालय,
चिखली, जि. बुलढाणा – ४४३२०१

**सार :**

भारताच्या राष्ट्रीय उत्पन्नात कृषी क्षेत्राचा वाटा अतिशय महत्त्वाचा राहिलेला आहे. भारतीय अर्थव्यवस्थेतील एकूण अन्नधान्य उत्पादन २९१.९५ दशलक्ष टनापर्यंत वाएलेले असून ते २०१९-२० या चालू वर्षात मागील वर्षापेक्षा ६.७४ मेट्रीक टन अधिक आहे. सन २०१८-१९ या वर्षात झालेले अन्नधान्य उत्पादन २८५.२१ दशलक्ष टन होते. २०१-२० या वर्षात डाळींचे उत्पादन २३.०२ दशलक्ष टन आहे, जे गेल्या ५ वर्षाचे डाळींचे सरासरी वार्षिक उत्पादन २०.२६ दशलक्ष टनापेक्षा अधिक आहे. प्रचंड आकारमान व उच्च वृद्धीदर असणाऱ्या लोसंख्येला गुणवत्तापूर्ण व सुदृढ जीवनमानासाठी आवश्यक भूमिका साकारण्यासाठी भारतातील कृषी क्षेत्राची वाटचाल अभ्यासणे कोविड-१९ च्या पार्श्वभूमीवर आवश्यक ठरते. त्या दृष्टीने या संशोधनपर निबंधात 'कोविड-१९ च्या लॉकडाऊन काळात कृषी क्षेत्रावर होणाऱ्या व झालेल्या परिणामांचा' थोडक्यात प्रकाशझोत टाकण्यासाचा संशोधकाने प्रयत्न केला आहे.

**प्रस्तावना :**

भारत कृषीप्रधान देश असून देशातील जवळपास ५२ टक्के कार्यकारी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. मात्र एकूण अंतर्गत उत्पादन (GDP) मध्ये शेतीचा हिस्सा २००९-१० मध्ये केवळ १४.६ टक्के होता. देशातील ४८ टक्के कार्यकारी लोकसंख्या जी गैरकृषी व्यवसायात कार्यरत आहे, त्यांचे एकूण अंतर्गत उत्पादनातील (GDP) योगदान ८३ टक्के आहे. शेती हा भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा असून खेड्यातील लोकांचा मुख्य व्यवसाय शेती हा आहे. मात्र या कण्याला कोविड-१९ च्या लॉकडाऊनने पुर्णतः मोडकळीस आणले आहे. गेल्या ३ महिन्यात भारतीय शेती अर्थव्यवस्थेची कोविड-१९ लॉकडाऊनने पुर्णपणे वाट लावली आहे. कृषी उत्पादनातील वाढ ही ५.३ टक्के नोंदविली गेली. (एप्रिल-जून २०१८ नुसार) मात्र कोरोना -१९ च्या लॉकडाऊनने मात्र शेतकऱ्यांची आर्थिक दैन्यावस्था केल्याचे पहावयास मिळते. या कोरोना -१९ च्या लॉकडाऊनमुळे भारतीय कृषी क्षेत्रावर झालेल्या परिणामांचा संशोधकांनी शोध घेण्याचा आपल्या संशोधन लेखात थोडक्यात प्रयत्न केलेला दिसून येतो.

**कोरोना-१९ च्या लॉकडाऊनमुळे कृषी क्षेत्रातील परिणामांच्या अभ्यासाचे महत्त्व :**

कोरोना-१९ लॉकडाऊनच्या उद्‌भवलेल्या परिस्थितीचा भारतीय कृषी क्षेत्रावरील परिणामांचा अभ्यास करणे महत्त्वाचे आहे. या परिणामांचे मूल्यांकन करणे आवश्यक आहे. त्यासाठी या अभ्यासाचे महत्त्व जाणून घेऊन संशोधन लेख तयार करण्यात आला आहे

Scanned with OKEN Scanner

 ISBN - 978-81-942797-4-7

**अभ्यासाची उद्दिष्टे :**

१) कोरोना-१९ मुळे कृषी क्षेत्रासमोरील आव्हानांचा अभ्यास करणे.

२) कोरोना -१९ च्या लॉकडाऊनमुळे कृषी क्षेत्रातील असणाऱ्या संधीचे विश्लेषण करणे.

३) कोरोना -१९ च्या लॉकडाऊनमुळे कृषी क्षेत्रावरील होणाऱ्या परिणामांच्या सोडवणूकीसाठी उपाययोजना सूचविणे.

**अभ्यासाची गृहितके :**

१) भारतात सतत कोरोना-१९ चा प्रभाव कमी होत राहील.

२) भारताच्या कृषी विकासातील वाढ कोरोना-१९ च्या लॉकडाऊनमध्ये मंद राहील.

३) कोरोना-१९ च्या लॉकडाऊनमुळे भारतीय कृषीवर परिणाम होत आहे.

**संशोधन पद्धती :**

संदरचे संशोधन पेपरचे अभ्यास पूर्णपणे दुय्यम सामुग्रीवर आधारीत असून त्यासाठी अर्थशास्त्राची विविध पुस्तके, ग्रंथ, वर्तमानपत्रे, साप्ताहिके, विविध अहवाल, मासिके, वार्षिकांक इ. संदर्भ म्हणून वापरण्यात आलेले आहेत.

**कोरोना-१९ ची पार्श्वभूमी :**

कोरोना-१९ हा विषाणू सर्वात घातक गणला जाऊ शकणारा विषाणू आहे. जगात आजतागायत ४७८९२०५ व्यक्तीला या रोगाची लागण झाली असून यात जगात ३१८७८९ लोकांचा या रोगामुळे मृत्यू झाला आहे. भारतात या रोगाचे १०७८१९ रुग्ण असून ३३१७ रुग्णांचा या रोगाने मृत्यू झाला आहे.

१९१८ मध्ये दीड कोटी भारतीय (६ टक्के) लोकसंख्या फ्ल्यूच्या साथीने मेली. २०२० मध्ये कोरोना विषाणूमुळे एवढे लोक मरणार नाहीत. संक्रामक रोगांवर भारताने विजय मिळवला आहे भारताचा जन्मदर दर हजारी ४० वरून २० वर निम्मा झाला. भारताचे सरासरी वय २८ वर्षे आहे. म्हणून भारताला 'तरुणांचा देश' म्हणतात.

३१ डिसेंबर २०१९ रोजी चीनमधील वुहान येथे या रोगाच्या संसर्गाची पहिली वार्ता बाहेर आली व ३ महिन्यांच्या अल्प कालावधीतच हा विषाणू जगातील ११४ देशामधील १ लाख १८ हजार रुणांपर्यंत पोहोचला. ९० दिवसात रुणांची संख्या १३ प वाढली.

३० जानेवारी २०२० ला भारतात कोरोनाचा विषाणू संसर्गाचे पहिले प्रकरण केरळमध्ये उजेडात आले ४९ दिवसांत तो २२ राज्यात पोहोचला.

**कोरोना-१९ च्या लॉकडाऊन चा भारतीय शेता क्षेत्रावरील परिणाम :**

कोरोना-१९ च्या लॉकडाऊनचा फटका भारतातील शेती क्षेत्रातील आंबा, द्राक्षे, डाळींब या सारख्या फळांच्या निर्यातीवर विपरित परिणाम होऊन ५० टक्के हून जास्त भाजीपाल्याची निर्यात घटण्याची शक्यता आहे. देशातून एकूण निर्यातीपैकी ६५ टक्के फळे व ५५ टक्के भाजीपाला निर्यात करणाऱ्या महाराष्ट्रावर कोरोनामुळे गंभीर आर्थिक संकट उभे राहिले आहे. द्राक्षे निर्यात होऊ शकली नाही. केळी, गहू यांच्याही निर्यातीत घट होणार आहे. २०१८-१९ या वर्षात २ कोटी ३० लाख ८४ हजार ६९० मेट्रीक टन शेतीमाल, फळ, फूल, प्रक्रिया केलेल्या शेती मालाच्या निर्यातीतून देशाला १ लाख ३० हजार ३८७ कोटी परकीय चलन मिळाले. यावर्षी कोरोना महामारीमुळे शेतकऱ्यांच्या मनसुब्यावर पाणी फिरले आहे.



Scanned with OKEN Scanner

ISBN - 978-81-942797-4-7

**महाराष्ट्रातून झालेली निर्यात ( को.रु. )**

**आंबा :**

| वर्ष | प्रमाण (मे.टन) | रक्कम |
|---|---|---|
| २०१७-१८ | ३५३४२.६ | ३०९ |
| २०१८-१९ | २९३४४५.५५ | ३१३ |
| २०१-२० | २१९२२४.०५ | २२४.९९ |

**द्राक्षे :**

| वर्ष | प्रमाण (मे.टन) | रक्कम |
|---|---|---|
| २०१७-१८ | २००२०३ | २१०६ |
| २०१८-१९ | १९४१०९.४१ | २११.८३ |
| २०१९-२० | ३६४४०.७४ | ३४५.८५ |

**केळी :**

| वर्ष | प्रमाण (मे.टन) | रक्कम |
|---|---|---|
| २०१७-१८ | ४४५५९.३ | १४९.४ |
| २०१८-१९ | ६१८२९.२३ | २०७.५७ |
| २०१९-२० | २८४४२.०२ | ९५.८७ |

**संत्री :**

| वर्ष | प्रमाण (मे.टन) | रक्कम |
|---|---|---|
| २०१७-१८ | ८७६.२४ | ४.५३ |
| २०१८-१९ | ३७.२३ | ०.२७ |
| २०१९-२० | ४.४८ | ०.०३ |

**डाळींब :**

| वर्ष | प्रमाण (मे.टन) | रक्कम |
|---|---|---|
| २०१७-१८ | ३२६५२.६ | ४१२ |
| २०१८-१९ | ४०७२० | ४९१.३६ |
| २०१९-२० | ६५९४.०२ | ६९.३५ |



Scanned with OKEN Scanner

ISBN - 978-81-942797-4-7

वरील महाराष्ट्रातील निर्यातीच्या आकडेवारीवरून हे सिद्ध होते की, कोरोना-१९ च्या लॉकडाऊनमुळे भारतातील शेती उत्पादनावर अत्यंत विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येते.

तसेच मागील ३ महिन्यापासून देशव्यापी लॉकडाऊनच्या काळात आधारभूत किंमती व उच्चतर किरकोळ किंमती च्या नियमांचे पालन न करता अधिकाधिक किंमती वसूल केल्या गेल्या असे मत ३९ टक्के लोकांनी व्यक्त केले, तर २१ टक्के लोकांनी ई. कॉमर्स वस्तूंवर जास्त किंमती वसूल केल्या गेल्याचे सांगितले.

नीती आयोगाच्या मते कोविड-१९ च्या लॉकडाऊनचा कृषी क्षेत्रावर जास्त परिणाम होणार नाही. चालू वित्तीय वर्षात कृषी क्षेत्राचा विकासदर ३ टक्के राहण्याचा अंदाज आहे. मागील वर्षी हा विकास दर ३.७ टक्के होता. लॉकडाऊन मध्येही खाद्य वस्तूंच्या विशेषत: दाळी, भाज्यांच्या पुरवठ्यावर कोणताही परिणाम नाही. त्यामुळे त्यांच्या किंमती पुर्णपणे नियंत्रणात आहेत. नीती आयोगाच्या मते, कृषी क्षेत्राचा एकूण जीडीपी मधील योगदान १५ टक्के पर्यंत आहे. चालू वर्षात २९.१९५ कोटी टन खाद्यान्नाचे रेकॉर्ड उत्पादन केले आहे. कृषी क्षेत्रात आजही भारतातील ६० टक्के लोकसंख्या समाविष्ट आहे. त्यामुळे इतर क्षेत्राप्रमाणेच कोरोना-१९ लॉकडाऊनच्या महारोगाने कृषी क्षेत्रावरही विपरित परिणाम झाला आहे. तरीही तांदूळ, तिळ, यांच्याही उत्पादनात वाढ केली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे लक्ष प्राप्त करण्यासाठी शेतीला फायदेशीर बनवले पाहिजे. त्यासाठी सिंचन, मुलभूत विकास, गुंतवणूक, विमा यां अधिक प्रभावशाली बनवण्याची आवश्यकता आहे, जेणेकरून सिमांत, लहान शेतकरी आधुनिक तंत्रज्ञानाच्या मदतीने सधन शेती करण्यासाठी ते सिद्ध होतील. शेतकऱ्यांसाठी कुक्कुटपालन, डेअरी, मत्स्यपालन, पशुपालन, रेमीम कीडे पालन, मधुमाशी पालन, फूल व भाजीपाला उत्पादन संबंधी पावले उचलणे गरजेचे आहे. त्यासाठी अधिक परिश्रम व पराकाष्टेची आवश्यकता आहे.

कोरोना-१९ विषाणूचा प्रसार रोखण्यासाठी लागू करण्यात आलेल्या टाळेबंदीमये वाढ झाल्यानंतर शेती क्षेत्रातील नाशवंत शेतमाल जसे कलींगड, खरबूज, काकडी, वांगी, पालक व अन्य पालेभाज्या शेतकऱ्यांना रोख पैसे मिळवून देतात. मात्र यावर्षी कोरोनाचा फैलाव रोखण्यासाठी टाळेबंदी जाहिर झाली, त्यामुळे बाजार समीत्यांचे कामकाज बंद झाले. शेतकऱ्यांच्या नाशवंत शेतमालाला बाजारपेठ नसल्याने हा माल विक्री अभावी शेतातच सडून गेला. द्राक्षे, डाळींब, कलींगड, खरबूज, काकडी, टाळेबंदीने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. हा माल ग्राहकापर्यंत पोहोचू शकला नाही. हा माल साठवून ठेवण्याची यंत्रणा नसल्याने सध्या हा माल शेतातच सडून चालला आहे. काही ठिकाणी तर शेतकऱ्यांनी या शेतमालाला योगय किंमत न मिळाल्याने जागेवरच नष्ट केला.

**काही इतर परिणाम :**

१) BSE सेन्सेक्स वर्षाच्या सुरुवातीस अडीच महिन्यात ३०.०२ टक्के घसरला. ही ३० वर्षातील सर्वात मोठी वेगवान घसरण आहे.

२) भारताच्या जी.डी.पी. त आरोग्य खर्चाचा वाटा सर्वात कमी ३.६ टक्के होतो.

३) चित्रपटगृहे, हॉटेलमधील गर्दी, मॉल, शाळा, कॉलेज, विमाने यातील गर्दी कमी होऊन बेरोजगारीत वाढ झाली.

४) खाद्यान्न पदार्थाचे भाव वाढले.

५) रेल्वे, ट्रक यांच्याद्वारा होणारी माल वाहतूक मंदावली.


Scanned with OKEN Scanner

ISBN - 978-81-942797-4-7


६) वीजेची मागणी घटली.

७) ग्राहकांचा विश्वास ढासळला.

८) ट्रक चालक सुटीवर गेल्याने जीवनावश्यक वस्तूंचा तुटवडा जाणवला.

९) कोट्यवधी लोक बेरोजगार झाले.

१०) व्यापारात वेगाने घट झाली.

११) भारताचा विकास दर ०.८ टक्के राहण्याचा अंदाज आहे. त्यात वेगाने घसरण झाली.

१२) जगभरातील २६५ दशलक्ष लोकांना भिषण अन्न टंचाईला तोंड द्यावे लागणार आहे.

१३) १९७९ नंतरची सर्वात मोठी मंदी आहे.

१४) उद्योगावर याचा विपरीत परिणाम होत आहे. उत्पादन ठप आहे.

१५) भारतीय अर्थव्यवस्थेच्या एकूण राष्ट्रीय उत्पन्नात ५ टक्के कमी कोईल.

१६) भारतात कोरोनाच्या संपर्कात येणारे ८० टक्के लोक किरकोळ आजारी तर १४ टक्के लोक गंभीर व ५ टक्के अतिगंभीर श्रेणीत आहेत.

१७) ७० वर्षाहून जास्त वयाच्या व्यक्तीचा मृत्यूदर ८ टक्के पेक्षा जास्त आहे.

१८) हृदयविकाराने होणारे मृत्यूदर सर्वाधिक १०.५ टक्के आहे.

**कृषी क्षेत्रासमोरील आव्हाने :**

१) कृषी क्षेत्रातील रोजगार वाढवणे.

२) कृषी क्षेत्रातील गुंतवणूकीत वाढ करणे.

३) कृषी क्षेत्रातील सिंचन क्षेत्रात वाढ करणे.

४) कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांचा विकास करणे.

५) कृषी क्षेत्रात पिकविमा योजनेत वाढ करणे.

६) कृषी क्षेत्रात इतर कृषी सहाय्यक व्यवसायात वाढ करणे.

**कृषी क्षेत्रातील संधी :**

१) कृषीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढवणे.

२) आधुनिक बी-बियाणांचा शोध लावणे.

३) कमी कालावधीचे वाण शोधून काढणे.

४) व्यापारी नगदी पिकांचे उत्पादन वाढीवर भर देणे.

**लॉकडाऊनचे काही चांगले परिणाम :**

१) दैनंदिन खर्च ४० टक्के कमी झाला.

२) शहरांतील गोंगाट, पाणी प्रदूषण, वायू प्रदूषणात घट झाली.

३) हवा शुद्ध, स्वच्छ पाणी, कमी ध्वनी व वायू प्रदूषण कमी झाले.

४) वीजेच्या वापरात घट झाली.

५) घरांच्या किंमती कमी झाल्या.

६) घरातील पारिवारीक संबंधात वेळ दिला गेला.

७) जागतिक तापमान वाढीत काही प्रमाणात घट होऊ शकते.


Scanned with OKEN Scanner

ISBN - 978-81-942797-4-7


**शेती क्षेत्रावरील परिणामांवरील उपाययोजना :**

१) आंबा, द्राक्षे, ऊस, केळी या उत्पादनांचे लघु-कुटीर उद्योग उभारावेत.

२) नगदी पिकांच्या उत्पादनावर भर द्यावा.

३) शेतीमाल प्रक्रीया उद्योगावर भर द्यावा.

४) नाशवंत कृषीमालाची उत्पादने कमी करावीत.

५) कृषी संशोधनावर भर द्यावा.

**निष्कर्ष :**

कारोना-१९ लॉकडाऊनसारख्या संकटांचा सामना करण्याची रोग प्रतिकारक शक्ती वाढविण्याची शक्ती शेतकऱ्यांत वृद्धींगत होत असून या काळात विषमुक्त शेती करून जीवंत राहतील. विषमुक्त भाजीपाला, धान्य, दूध, दही, घरोघरी पोहोचवण्यासाठी हजारो कामगारांची गरज आहे. पिकांची लागवड हा शेतांचा विमा व्हावा. पिकाला किफायतशीर भाव मिळवून देण्याची जबाबदारी सरकारने स्विकारली पाहिले. मूल्यवर्धन प्रक्रीया केल्यास शेतकऱ्यांच्या उत्पन्नात वाढ होण्यास मदतच होईल. या परिस्थतीचा सामना करण्यासाठी शेतकरयांनी प्रिव्हेन्शन, प्रिपेअर्डनेस, पब्लिक हेल्थ, पॉलिटिकल लीडरशिप व पिपल या बाबींचा सांभाळ करावा. भारत जगातील एक मोठी बाजारपेठ असून भारतात तरुणांची संख्या मोठी आहे. या तरुणांनी तंत्रज्ञानाची ओळख करून घेतल्यास देशातील स्वस्त मनुष्यबळाचा वापर करून कृषी क्षेत्रातील पायाभूत सुविधांची उपलब्धता करावी. यातूनच कृषी क्षेत्रासह देशाचा व स्वत:चाही विकास साधला जाऊन अशा कोरोना-१९ विषाणू ला सामोरे जाण्याची शक्ती शेतकऱ्यांना मिळो हीच अपेक्षा.

**संदर्भ सूची :**


१) दै. लोकसत्ता

२) दै. सकाळ

३) दै. दिव्यमराठी

४) दै. महाराष्ट्र टाइम्स

५) दै. लोकमत

६) दै. नवभारत टाईम्स

७) दै. जनसत्ता

८) दै. जनशक्ती

९) दै. जागरण

१०) दै. लोकशाही वार्ता

११) दै. सामना


Scanned with OKEN Scanner

One Day Interdisciplinary National e-Conference
Organized by
The Mehkar Education Society's

# M.E.S. Arts & Commerce College,

Mehkar Dist. Buldana.
(Affiliated to Sant Gadge Baba Amravati University Amravati, Maharashtra)

## CERTIFICATE

This is to certify that DR./Mr./Mrs./Ms. PROF. DR. DILIP PANDURANG MAHAJAN of SPM TATYASAHEB MAHAJAN ARTS AND COMMERCE COLLEGE CHIKHALI DIST BULDANA has participated / Presented a research paper entitled BHARTIYA SHETI KSHETRAVAR CORONA 19 CHYA LOCKDOWNCHA PARINAM ............At the One Day Interdisciplinary National e-Conference' on 'COVID-19 & Its Impact on various factors' held on 26 May 2020.

| Dr. Uday S. Kale | Dr. Om. M. Gajbhiye | Dr. Ganesh N. Parihar |
|---|---|---|
| Conference Convener | Conference Co-Convener | Conference Chairman |

2019-20

Scanned with OKEN Scanner